## नको बाबा असे कधी, घडायला नको

नको बाबा असे कधी, घडायला नको
माझ्या मुळे मन तुझे, मोडायला नको

वीट येतो बघून हि, जीवघेणी स्पर्धा
चढाओढ कोणी आता, करायला नको

चढलेली रात्र आणि, वाढलेला दंगा
बाळ माझे दचकून, उठायला नको

करू नका उभे त्याला, ऐका थोडे तरी..
आवेशाने काही बाही, बोलायला नको

थकलेली गात्र आणि, ऐकू येते कमी
पण डोळ्यामध्ये फुल बाई, पडायला नको

"होऊ द्या ना खर्च", असा आजचा हा मंत्र
आयुष्य हे "कवडी" चे, ठरायला नको

"प्रीती" म्हणे जनी, राहो सारेच सुखाने
पण उतायला नको, कोणी मातायला नको

**~ ©प्रीती देशपांडे**